श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| वर्ष-६, अंक-२ | फेब्रुवारी-२०१८ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ४ |

## वालावलकर रुग्णालयात आधुनिक क्षयरोग तपासणी उपकरणाचा लोकार्पण सोहळा

रत्नागिरी जिल्ह्यात प्रथमच सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमात महाराष्ट्र शासन व वालावलकर रुग्णालय, श्रीक्षेत्र डेरवण यांच्या संयुक्त विद्यमाने क्षयरोग तपासणी (CBNAAT अर्थात Gene Xpert Machine Centre) केंद्राचा उद्घाटन सोहळा दि. २.२.२०१८ या दिवशी मा. श्रीमती ऋतुजा खांडेकर, मा. सभापती महिला व बाल कल्याण समिती, चिपळूण यांच्या उपस्थितीत साजरा झाला. या कार्यक्रमासाठी मा. डॉ. पी. एन देवकर, जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी, मा. डॉ. ए. ए. आठल्ये, जिल्हा आरोग्य अधिकारी रत्नागिरी व डॉ. डी. बी. सुतार, जिल्हा क्षयरोग अधिकारी, रत्नागिरी हे उपस्थित होते.

क्षयरोगाचे त्वरीत व अचूक निदान होण्यासाठी या मशिनचा उपयोग होणार असल्याने क्षयरोग उच्चाटन मोहिमेला याचा चांगला हातभार लागेल असे मा. डॉ. पी. एन देवकर, जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी यांनी आपल्या स्वागतपर भाषणात नमुद केले. क्षयरोगाची तपासणी अचूक होण्याची सोय झाल्याबद्दल मा.डॉ.ए.ए. आठल्ये, जिल्हा आरोग्य अधिकारी रत्नागिरी यांनी आनंद व्यक्त केला. कोकणातील वैद्यकीय व्यावसायिकांनी या सोयीचा लाभ घेऊन संशयित रुग्णांची थुंकीचे व इतर नमुने तपासणीसाठी पाठवून क्षयरोग प्रतिबंधाला हातभार लावावा असे




*डावीकडून डॉ. पी. एन. देवकर, डॉ.सुवर्णा पाटील, मा.ऋतुजा खांडेकर, डॉ. अलका गोगटे, श्री.विकासराव वालावलकर, डॉ. ए. ए.आठल्ये, डॉ. डी. बी.सुतार, डॉ.डोमले,*

आवाहन व डॉ. डी. बी. सुतार जिल्हा क्षयरोग अधिकारी, रत्नागिरी यांनी उपस्थितांना केले.

या क्षयरोग तपासणी उपकरणाची माहिती डॉ. सौ. अलका गोगटे, प्राध्यापिका, भ.क.ल.वालावलकर ग्रामिण वैद्यकीय महाविद्यालय यांनी दिली. संस्थेचे प्रमुख विश्वस्त मा. श्री. विकासराव वालावलकर व वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांनी मान्यवरांचे स्वागत केले. या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. डोमले, भ.क.ल.वालावलकर ग्रामिण वैद्यकीय महाविद्यलय, महाविद्यालयातील इतर प्राध्यापक, व विद्यार्थी उपस्थित होते.

## नर्सिंग स्कूल डेरवण येथे 'सी.एन. ई.'

परिचर्या शिक्षणात सतत होणारे बदल, उपलब्ध होणारी नवी माहिती आणि प्रतिदिनी विस्तारणाऱ्या शिक्षणाच्या कक्षा याची माहिती परिचर्या शिक्षण घेणाऱ्या व प्रत्यक्ष काम करणाऱ्या परिचारिकांना व्हावी या हेतूने 'श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट' डेरवणच्या 'समर्थ इन्स्टिट्युट ऑफ नर्सिंग एज्युकेशन' या संस्थेत महाराष्ट्र परिचर्या परिषदेच्या अंतर्गत दिनांक ६ जानेवारी २०१८ या दिवशी प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या एक दिवसाच्या शिबिरामध्ये 'सर्वोत्तम माता व बाल परिचर्या' या विषयावर प्रशिक्षण देण्यात आले. शिबिरासाठी भारती विद्यापीठ, सांगली येथून श्री. सुनील कुलकर्णी, वॅनलेस नर्सिंग कॉलेज, मिरज येथून सौ. जसिका वाघमारे, रत्नागिरी येथील बालरोग तज्ज्ञ डॉ. रश्मी आठल्ये व भ.क.ल.वालावलकर मेडिकल कॉलेज येथील प्राध्यापक व बालरोगतज्ज्ञ डॉ. विजयकुमार पोतदार, परशुराम नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य श्री. मिलिंद काळे हे उपस्थित होते. या सर्व मान्यवरांचे मार्गदर्शन प्रशिक्षणासाठी उपस्थित २९८ शिबिरार्थींना लाभले.

# डेरवण इंग्रजी शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

डेरवण येथील श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ नुकताच उत्साहात संपन्न झाला. या वेळी विश्वकर्मा इन्स्टिट्युटचे प्राध्यापक डॉ. चंद्रशेखर गर्दे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली. विद्यार्थ्यांनी ईशस्तवन, स्वागतगीत सादर केले. प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीम. जुन्नरकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. शाळा संचालिका सौ. शरयू यशवंतराव यांनी पाहुण्यांचा सत्कार केला व शाळेच्या वर्षभरातील प्रगतीचा आढावा घेतला.

प्रमुख पाहुणे डॉ.चंद्रशेखर गर्दे यांच्या हस्ते शालेय, सहशालेय व क्रीडा स्पर्धांमध्ये नैपुण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थी व पालक यांच्याशी संवाद साधताना डॉ. चंद्रशेखर गर्दे म्हणाले की, तुमच्या या शाळेमध्ये केवळ पुस्तकी ज्ञानावर भर न देता इतर अनेक सहशालेय व व्यवसायाभिमुख तसेच जीवनोपयोगी उपक्रमांना महत्त्व दिले जाते. त्यामुळे तुमचा सर्वांगीण विकास होण्यास नक्कीच मदत होते. तुम्ही खूप शिका, उच्चशिक्षित व्हा आणि त्यासाठी विद्यार्थ्यांनी केवळ सैद्धांतिक गोष्टीवर आणि पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता, प्रात्यक्षिक प्रकल्प कार्यावर भर दिला पाहिजे. तंत्रज्ञान शिकत असताना आचार आणि विचारामध्ये 'मानवता' हे मूल्य मात्र कायम जागृत ठेवायला पाहिजे.

यानंतर विद्यार्थ्यांनी भारतातील विविध परंपरा, संस्कृती आणि लोककला यांचे दर्शन घडविणारा नृत्य-नाट्याचा बहारदार कार्यक्रम सादर केला. 'पुष्पांजली' या भरतनाट्यम् नृत्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. थोर समाजसुधारिका रमाबाई रानडे यांच्या जीवनकार्यावर सादर केलेला एकपात्री नाट्यप्रयोग मनाला भिडणारा ठरला. तसेच या वेळी सर्वांना क्रांतिकारकांच्या बलिदानाची आणि देशभक्तांच्या कार्याची आठवण करून देणारे मूकनाट्य सादर करून विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला रंग चढविला. बदलत्या पिढीनुसार वाढणारा तंत्रज्ञानाचा वापर, आजी-आजोबा आणि नातवंडे यांच्या संवादातून दाखवून 'सिनिअर के. जी.'च्या विद्यार्थ्यांनी प्रेक्षकांच्या बालपणीच्या स्मृती जागृत केल्या. विद्यार्थ्यांनी भारतातील विविधतेतील एकता, देशभक्तिपर गीते, शेतकरी, आदिवासी, भांगडा, राजस्थानी चिरमी, योगासने, पारंपरिक संगीत, इंग्रजी गाण्यांवर आधारित नृत्ये तसेच थोर व्यक्तींना मानवंदना देणारी नृत्ये सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी संस्थेचे प्रमुख विश्वस्त प.पू. श्रीकाकामहाराज, कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर, संस्थेतील इतर मान्यवर व पालक मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते. शाळा संचालिका सौ. शरयू यशवंतराव यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापिका श्रीम. प्रज्ञा पारकर, श्रीम. जुन्नरकर, श्री. जुवेकर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रयत्न केले. भ.क.ल.वालावलकर रूग्णालय रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण.




*डॉ. चंद्रशेखर गर्दे शाळेच्या स्नेहसंमेलनात भाषण करताना; व्यासपीठावर डावीकडून श्रीम. उज्ज्वला जुन्नरकर, श्रीम. प्रज्ञा पारकर, श्रीम. शरयू यशवंतराव, मा. श्री विकासराव वालावलकर आणि श्री. कल्पेश जुवेकर*

# ‘एस.व्ही.जे.सी.टी.’ क्रीडासंकुलात राष्ट्रीय स्पर्धांचे यशस्वी आयोजन

स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडिया, क्रीडा व युवक संचालनालय, जिल्हा क्रीडा कार्यालय तसेच ‘एस.व्ही.जे.सी.टी.’ क्रीडासंकुलाच्या संयुक्त विद्यमाने ६३ व्या राष्ट्रीय शालेय ॲथलेटिक्स स्पर्धेचे आयोजन क्रीडासंकुलात दि. १८ ते २१ जानेवारी २०१८ दरम्यान करण्यात आले. या स्पर्धेमध्ये उत्तराखंड, लक्षद्वीप, जम्मू आणि काश्मिर, मणिपूर, अरुणाचल प्रदेश, महाराष्ट्र, गोवा, केरळ, तामिळनाडू, पंजाब, हरियाना, दिल्ली अशा एकूण ३३ राज्यांनी व केंद्रशासित शिक्षण संस्थांनी सहभाग नोंदविला होता. एकूण ८०० खेळाडू सहभागी झाले. कोकणात प्रथमच राष्ट्रीय ॲथलेटिक्स स्पर्धेचे आयोजन ‘एस.व्ही.जे.सी.टी.’ क्रीडासंकुलामार्फत करण्यात आले होते. त्यामुळे कोकणातील खेळाडू तसेच क्रीडाप्रेमींना या भव्य राष्ट्रीय स्पर्धेचा पुरेपूर आनंद घेता आला. क्रीडासंकुलातील अद्ययावत सुविधा तसेच सरावासाठी व स्पर्धेसाठीचे कोकणातील पोषक वातावरण हे या स्पर्धेचे मुख्य आकर्षण ठरले.

महाराष्ट्र संघाच्या सहभागी खेळाडूंचे प्रशिक्षण-शिबिर नांदेड जिल्हा क्रीडा कार्यालयातील क्रीडा मार्गदर्शिका शिवकांता देशमुख तसेच बालेवाडी क्रीडा-प्रबोधिनीचे क्रीडा मार्गदर्शक महेश पाटील यांच्या मार्गदर्शनखाली दि. १२ जानेवारी ते १७ जानेवारी या काळात क्रीडासंकुलात पार पडले. तसेच स्पर्धा आयोजनासाठी रत्नागिरी जिल्हा क्रीडाअधिकारी मिलिंद दीक्षित, रत्नागिरी जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे सचिव संदीप तावडे, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक नितीन पाटकर, जिल्हा क्रीडा कार्यालयातील सर्व पदाधिकारी क्रीडासंकुलात उपस्थित होते. या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीने यजमानपद मिळालेल्या महाराष्ट्र संघातील मुलांचा आत्मविश्वास द्विगुणित झाला आणि संघाने अतिशय उत्तम कामगिरी केली.

स्पर्धेचे उद्घाटन माननीय आमदार सदानंद चव्हाण (चिपळूण) यांच्या हस्ते दि. १८ जानेवारी रोजी संध्याकाळी ४.३० वा. झाले. या कार्यक्रमाला ‘एस.व्ही.जे.सी.टी.’चे मुख्य विश्वस्त श्री. अशोक जोशी (श्रीकाकामहाराज) तसेच कार्यकारी विश्वस्त श्री. विकास वालावलकर, जिल्हा क्रीडा अधिकारी मिलिंद दीक्षित, पॉवर लिफ्टिंग खेळातील शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या संपदा धोपटकर, तसेच मल्लखांब खेळातील शिवछत्रपती पुरस्कार विजेते शांताराम जोशी, श्री. संदीप तावडे, ‘एस.जी.एफ.आय.’चे प्रतिनिधी सुरेंद्रकुमार गुज्जर तसेच राकेश नायक व सर्व राज्यांचे खेळाडू, प्रशिक्षक व मार्गदर्शक उपस्थित होते. सांस्कृतिक कार्यक्रमाने बहरून आलेल्या उद्घाटन कार्यक्रमात मा. आमदार सदानंद चव्हाण तसेच श्री. विकासराव वालावलकार यांनी खेळाडूंना खेळ आणि आरोग्याचे महत्त्व समजावून सांगितले.

‘खेळ मुलांना आयुष्यातील अडचणींना सामोरे जाण्यास मदत करतो. पालकांनी मुलांमधील खेळाडू वृत्तीला प्रोत्साहन द्यावे, भक्कम समाज घडविण्यास मदत करावी तसेच प्रचंड युवाशक्ती असणाऱ्या अब्जाधीश अशा भारत देशाने ऑलिम्पिकमध्ये भरघोस पदके मिळविण्यासाठी अधिकाधिक खेळाडूंनी संकुलात येऊन खेळावे. येथे राष्ट्रीय स्पर्धा प्रथमच भरविण्यात आली आहे. त्या निमित्ताने क्रीडासंकुलातील अद्ययावत सुविधांचा लाभ संपूर्ण भारतातील खेळाडूंना घेता येणार आहे. विविध प्रांतातून आलेल्या संघांनी मैदानावर सरावाची मजा लुटण्यास सुरुवात केली आहे.’असे विचार व्यक्त करून त्यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेत धावणे, लांब उडी, उंच उडी, गोळाफेक, ‘फोर-बाय-फोर’ रिले, ८० मीटर हर्डल्स, यांचा समावेश करण्यात आला होता. सर्वसाधारण विजेतेपदासाठी महाराष्ट्र, केरळ, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, पंजाब, हरियाना यांच्यामध्ये शेवटपर्यंत चुरस कायम होती. महाराष्ट्राने ५० गुणांची कमाई करीत सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. महाराष्ट्राच्या मुलींनी तब्बल ४३ गुण मिळवून तर दिल्लीच्या मुलांनी ३१ गुण मिळवून प्रथम क्रमांक संपादन केला. सर्वोत्कृष्ट खेळाडूचा मान मुलींमध्ये केंद्रीय विद्यालयाच्या गौतमी शेट्टीने तर मुलांमध्ये दिल्लीच्या मनीष कुमार आणि शौर्य राजपूत यांनी विभागून संपादन केला.




*राष्ट्रीय शालेय ॲथलेटिक्स स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी मानवंदना स्वीकारताना (डावीकडून) प.पू. श्रीकाका महाराज, आमदार श्री. सदानंद चव्हाण, श्री. विकासराव वालावलकर आणि क्रीडाविभागाचे पदाधिकारी*

## भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र

श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

स्पर्धेचा शेवटचा दिवस चुरशीचा ठरला. सर्वसाधारण विजेतेपदासाठी खेळाडू, प्रशिक्षक यांच्यात जोरदार रस्सीखेच दिसून येत होती. महाराष्ट्राने शेवटच्या दिवशी १ सुवर्ण, ३ रौप्य आणि २ कांस्य पदकाची कमाई करीत सर्वसाधारण विजेतेपदाचा मान मिळवला. यात मुलींचा वाटा मोठा ठरला.

कोकणात प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या या राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन यशस्वी झाल्याची प्रतिक्रिया देशभरातून आलेल्या खेळाडू, प्रशिक्षक आणि व्यवस्थापकांनी दिली. डेरवण येथील आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडासंकुल सर्वानाच आवडले. येथील सिंथेटिक्स ट्रॅक आणि एकूणच वातावरणामुळे खेळाडूंची कामगिरी उंचावल्याचे सर्वांनी आवर्जून सांगितले. बक्षीस वितरणच्या कार्यक्रमाला माजी क्रिकेटपटू चंद्रकांत पंडित तसेच डी.वाय.एस.पी. जानवे मॅडम उपस्थित होत्या.

स्पर्धेची सांगता दि. २१ जानेवारी रोजी आंतरराष्ट्रीय कुस्ती खेळाडू तसेच पुणे येथील क्रीडा व युवक संचालनालयाचे प्रमुख माननीय अरुण पाटील यांच्या हस्ते पदक वितरण करून सकाळी ११ वाजता झाली. त्यांनी यशस्वी स्पर्धा आयोजनाबद्दल सर्वांचे अभिनंदन केले. या वेळी उपस्थित वरिष्ठ मल्याळम पत्रकार सी. के. संतोष आणि ॲम्बी व्हॅली, सहारा, पुणे येथील उदय सुर्वे यांनी उत्कृष्ट क्रीडासंकुलाबद्दल आणि स्पर्धा नियोजनाबद्दल संतोष व्यक्त केला.

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान आणि संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण**

### पुणे व मुंबई येथून फेब्रवारी २०१८ मध्ये येणाऱ्या विविध तज्ज्ञ डॉक्टरांचे वेळापत्रक

| दिनांक | डॉक्टरांचे नांव | उपचार |
|---|---|---|
| २७.१.१८ ते ०३.२.१८ | इंग्लंड येथील डॉक्टरांचे शस्त्रक्रिया शिबीर | सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया |
| दर शनिवारी | डॉ. सुनील नाडकर्णी, पुणे (एम.एस.ऑर्थो) | अस्थिरोग तपासणी व दुर्बिणीद्वारे मणक्याची शस्त्रक्रिया |
| ११.०२.१८ | डॉ. आनंद जोशी, मुंबई (गॅस्ट्रोएंटरोलॉजिस्ट) | पचनसंस्था तपासणी व उपचार तज्ज्ञ |
| १६/१७.०२.१८ | टाटा हॉस्पिटल डॉक्टर्स, मुंबई | कॅन्सर शस्त्रक्रिया व उपचार |
| १७.०२.१८ | डॉ. श्रीपाद बाणवली, मुंबई (कर्करोग तज्ज्ञ) | कर्करोग तपासणी व उपचार तज्ज्ञ |
| १७.०२.१८ | डॉ. निषाद ठाकुरदेसाई, मुंबई (फिजीओथेरपिस्ट) | व्यवसाय उपचार तज्ज्ञ |
| १७.०२.१८ | डॉ. सुजाता नाईक, मुंबई (होमिओपॅथीक) | त्वचारोग तज्ज्ञ |
| १७.०२.१८ | डॉ. शिवप्रसाद दाते, मुंबई (प्लास्टीक सर्जन) | भाजलेले व्रण, डाग- शस्त्रक्रिया व उपचार |
| १७.०२.१८ | डॉ. के. मंजुळा, मुंबई (नेत्ररोग तज्ज्ञ) | डोळ्याच्या रेटिनाच्या विशेषज्ज्ञ व उपचार |
| ०३.०२.१८ | डॉ. सतेज सबनीस, मुंबई (युरोलॉजिस्ट) | दुर्बिणीद्वारे मुतखड्यांचे शस्त्रक्रिया तज्ज्ञ |
| २५.०२.१८ | डॉ. संजय ओक, मुंबई (बाल शल्य विशारद) | लहान मुलांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रियांचे तज्ज्ञ |

**डॉ. सुनील नाडकर्णी दर शनिवारी दुपारी १.०० वाजेपर्यंत UHTC चिपळूण व त्यानंतर वालावलकर रुग्णालय येथे भेटतील.**
**आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्णबधिरांना 'श्रवणयंत्र' (कानाचे यंत्र) प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी मोफत मिळेल. यासाठी केशरी किंवा पिवळे रेशन कार्ड व त्याची झेरॉक्स आणणे आवश्यक आहे.**
**दि. २२ डिसेंबर २०१८ सरपंच मेळावा । दि. २.२.१८ व दि. ६.२.१८ डोहाळेजेवण व सासू सून मेळावा**
**दि. ५ आणि ७.२.२०१८ सामुदायिक वाढदिवस**

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले.
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील, **संपादक मंडळ :** श्री. प्रफुल्लराव गोडबोले, सौ. शरयू यशवंतराव, श्री. श्रीकांत पराडकर